# दिनांक ०२ सप्टेंबर २०२१ पासून सुरु होणा-या समुपदेशनासाठी उमेदवारांना सूचना

सार्वजनिक आरोग्य विभागात महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा, गट अ या संवर्गातील वैद्यकिय अधिकारी, गट अ संवर्गातील जाहिरात क्र. ०२/२०२१ च्या अनुषंगाने ११५२ रिक्त पदांची भरतीप्रक्रिया समुपदेशनाने दिनांक ०२-०९-२०२१ ते दिनांक ०६-०९-२०२१ दरम्यान आरोग्य भवन येथे घेण्यात येणार आहे.

त्यानुसार उमेदवारांना पुढील सूचना देण्यात येत आहेत

१. जाहिरात दिनांक ०९-०८-२०२१ क्र.०२/२०२१ नुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांचे समुपदेशन खालील तक्त्यात दर्शविलेल्या दिनांक व वेळेस घेण्यात येणार आहे.

| दिनांक | वेळ | विशेषज्ञ | गुणवत्ता क्रम |
|---|---|---|---|
| ०२.०९.२०२१ | ९.०० | अतिविशेषोपचार तज्ञ (Super Specialty) | १ ते १० |
| | | बालरोगतज्ञ (Pediatrician) | १ ते ११३ |
| | ११.०० | भिषक (Physician) | १ ते ५८ |
| | | भुलतज्ञ (Anesthetist) | १ ते ६५ |
| | २.३० | स्त्रीरोगतज्ञ (Gynecologist) | १ ते १३१ |
| | | शल्यचिकित्सक (General Surgeon) | १ ते ५१ |
| | ४.३० | कान-नाक-घसा (ENT) | १ ते २९ |
| | | नेत्ररोगतज्ञ (Ophthalmologist) | १ ते ७६ |
| ०३.०९.२०२१ | ९.०० | अस्थीव्यंगोपचारतज्ञ (Orthopedic) | १ ते ८७ |
| | | त्वचा रोगतज्ञ (Skin & VD) | १ ते २३ |
| | | शारीरविकृतीतज्ञ (Pathologist) | १ ते ६८ |
| | | रक्त संक्रमण अधिकारी (Blood Transfusion Officer) | १ ते ४ |
| | ११.०० | क्ष-किरणतज्ञ (Radiologist) | १ ते २९ |
| | | मानसोपचारतज्ञ (Psychiatrist) | १ ते २३ |
| | | पी.एस.एम (PSM) | १ ते ५३ |
| | २.३० | एम. बी. बी. एस. (MBBS) | १ ते १२५ |
| | ४.३० | एम. बी. बी. एस. (MBBS) | १२६ ते २५० |
| ०४.०९.२०२१ | ९.०० | एम. बी. बी. एस. (MBBS) | २५१ ते ३७५ |
| | ११.०० | एम. बी. बी. एस. (MBBS) | ३७६ ते ५०० |
| | २.३० | एम. बी. बी. एस. (MBBS) | ५०१ ते ६२५ |
| | ४.३० | एम. बी. बी. एस. (MBBS) | ६२६ ते ७५० |
| ०५.०९.२०२१ | ९.०० | एम. बी. बी. एस. (MBBS) | ७५१ ते ८७५ |
| | ११.०० | एम. बी. बी. एस. (MBBS) | ८७६ ते १००० |
| | २.३० | एम. बी. बी. एस. (MBBS) | १००१ ते ११२५ |
| | ४.३० | एम. बी. बी. एस. (MBBS) | ११२६ ते १२५० |

| दिनांक | वेळ | विशेषज्ञ | गुणवत्ता क्रम |
|---|---|---|---|
| ०६.०९.२०२१ | ९.०० | एम. बी. बी. एस. (MBBS) | १२५१ ते १३७५ |
| | ११.०० | एम. बी. बी. एस. (MBBS) | १३७६ ते १५०० |
| | २.३० | एम. बी. बी. एस. (MBBS) | १५०१ ते १६२५ |
| | ४.३० | एम. बी. बी. एस. (MBBS) | १६२६ ते १७०० |

२. समुपदेशन प्रक्रियेचे ठिकाण - तळमजला, आरोग्य भवन, सेंट जार्जेस रुग्णालय आवार, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ, पी डीमेलो रोड, मुंबई – ४०० ००१.

३. सर्व उमेदवारांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची व त्यासोबतच्या सर्व कागदपत्रांची प्रत्येकी एक स्वसांक्षाकीत प्रत सोबत आणावी.

४. समूपदेशनासाठी स्वतःचे ओळखपत्र, जन्मदिनांकाबाबतचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, पदवी/ पदविका प्रमाणपत्र यांचे मुळ प्रमाण पत्रे व १ फोटो तसेच ४८ तासातील Rapid Antigen Test अहवाल सहित उपस्थित रहाणे अनिवार्य आहे.

५. Rapid Antigen Test अहवाल Positive असल्यास प्रवेश दिला जाणार नाही.

६. मुळ प्रमाण पत्रांच्या अभावी समुपदेशन होऊ शकले नाही तर त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

७. दिव्यांग उमेदवारांना समुदेशनासाठी प्राधान्याने बोलावून त्यांचे प्रथम समुपदेशन घेण्यात येईल.

८. जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे समुपदेशनासाठी पदव्युत्तर पदवी - पदविका धारक उमेदवारांना प्राधान्य असल्याने त्यांना प्रथम बोलविण्यात येवून नंतर निव्वळ एमबीबीएस पदवी धारकांना बोलविण्यात आले आहे.

९. दिनांक २८.०८.२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या अंतिम गुणवत्ता यादीत कोणताही बदल होणार नाही.

१०. नोंदणी दर दिवशी वेळापत्रका प्रमाणे सुरु होईल.

११. कोणत्याही कारणास्तव उमेदवारास समुपदेशनाच्या ठिकाणी पोहोचण्यास विलंब झाल्यास व त्यामुळे त्याचा जेष्ठताक्रम हुकल्यास त्यास तो उमेदवार स्वतः जबाबदार राहिल. अशा उमेदवारांचे समुपदेशन करतांना त्यांच्या अपेक्षित पसंतीचे ठिकाण आधीच्या उमेदवाराने घेतले असल्यास त्यांस उपलब्ध होणार नाही व शिल्लक जागांमधूनच त्यांना एका जागेची निवड करणे बंधनकारक राहिल.

१२. केवळ गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच नियुक्तीच्या ठिकाणाचा पसंती क्रम दर्शविण्यासाठी मुळ प्रमाणपत्रासह व प्रवेश पत्रासह समुपदेशनाकरीता व्यक्तीशः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तथापि, खाली नमुद कारणांसाठी उमेदवाराने प्राधिकार पत्र दिलेल्या व्यक्तीस समुपदेशनासाठी उपस्थित राहता येईल. परंतू, अशा प्रकरणी प्राधिकृत व्यक्तीने घेतलेल्या निर्णयानुसार शासन स्तरावरुन निर्गमित करण्यात येणा-या आदेशात त्यांनतर कोणतीही बदल करता येणार नाही.

I. उमेदवार स्वतः covid +ve असल्यास ( प्राधिकृत व्यक्तीसोबत उमेदवाराचा ४८ तासातील covid अहवाल असणे आवश्यक राहील)

II. गर्भवती स्त्री उमेदवार ज्यांना प्रवास करण्यास अनुमती नाही. ( परंतू यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे किंवा त्यांनी counter sign केलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे)

III. उमेदवार स्वतः आंतररुग्ण म्हणुन रुग्णालयात दाखल असेल तर ( परंतू यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे किंवा त्यांनी counter sign केलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे)

१३. समुपदेशनास अनुपस्थित राहिल्यास उमेदवारास पदस्थापना देण्यांत येणार नाही, व भविष्यात सदर उमेदवाराचा या जाहिरातीच्या अनुषंगाने पदस्थापनेसाठी विचार केला जाणार नाही .

१४. पदस्थापनेकरीता समुपदेशन करणे ही संपूर्णपणे प्रशासकीय स्वरुपाची बाब असल्यामुळे उमेदवाराने या प्रक्रियेमध्ये राजकिय / अराजकिय किंवा इतर कुठल्याही स्वरुपात दबाव आणल्यास सदर उमेदवार नियुक्ती प्रकियेतुन बाद होईल.

१५. समुपदेशन प्रक्रिया झाल्यानंतर उमेदवारास त्याच दिवशी पदस्थापना आदेश देण्यांत येईल. पदस्थापना आदेश प्राप्त केल्याशिवाय उमेदवारांना समुपदेशनाचे ठिकाण सोडता येणार नाही.

१६. पदस्थापना आदेशातील सर्व अटी व शर्ती उमेदवारास बंधनकारक राहतील व त्याविरोधात त्यास कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

१७. शासन स्तरावरुन आवश्यकतेनुसार रिक्त जागांमध्ये बदल करण्याचे अधिकार राखून ठेवण्यांत येत आहेत.

१८. <u>जाहिरातीत नमुद पदे भरल्यानंतर समुपदेशन प्रक्रिया थांबविण्यात येईल.</u>

**१९. समुपदेशनाच्या दिवशी तपासण्यात येणा-या खालील कागदपत्राच्या मुळ प्रती सोबत आणणे बंधनकारक आहे.**

| अ.क्र | कागदपत्राचा तपशील |
|---|---|
| १ | Rapid Antigen Test Report |
| २ | जन्म दिनांकाबाबतचे अधिकृत प्रमाणपत्र |
| ३ | शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र |
| ४ | आंतरवासिता पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र |
| ५ | महाराष्ट्र वैद्यक परिषदेकडे नोंदणी केलेले प्रमाणपत्र |
| ६ | अनुभवाचे प्रमाणपत्र |
| ७ | जात प्रमाणपत्र |
| ८ | जात वैद्यता प्रमाणपत्र |
| ९ | नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र |
| १० | अपंगत्व प्रमाणपत्र |
| ११ | खेळाडू प्रमाणपत्र |
| १२ | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र |
| १३ | ओळख प्रमाणपत्र |
| १४ | अर्ज करताना भरलेलया माहिती संदर्भात पुष्टयर्थ जोडलेली इतर कागदपत्रे |
| १५ | यापुर्वी नामनिर्देशनाने निवड मंडळ मार्फत / म.लो.से. आयोग मार्फत निवड झाली होती (होय/नाही) |